भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,

भिवंडी, जि. ठाणे.

दरपत्रक सूचना

जा.क्र.भिनिशमनपा/वैआवि/ २५६३ /25

दि. २६/१२/२०२५

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची **दि. 15/01/2026** रोजी मतदान प्रक्रिया संपन्न होणार आहे. सदर निवडणूकीच्या मतदान केंद्रांकरीता खालील 14 औषधे व वैद्यकिय साहित्य अंतर्भूत असलेल्या प्रथमोचार पेटींची (First Aid Box) आवश्यकता आहे.

Sr.No.	Description	Sr.No.	Description
1	Tab. Isosorbid di Nitrate (20Tab)	8	Ciprofloxacin drops 5ml (5 Bottle)
2	Tab. Paracetamol 500mg (20Tab)	9	Diclofenac gel 30gm. (3 Tube)
3	Tab. Furazolidine 100mg (20Tab)	10	Povidone Iodine 5% 15gm. (5 Tube)
4	Tab. Diclofenac Sod 50mg (20Tab)	11	Roll Bandage 10cmx3mt (10 Roll)
5	Cap. Omeprazole 20mg (20Cab)	12	Ab Cotton 50gm (02 Bundle)
6	Tab. Cetrizine 10mg (20Tab)	13	Ad tape 5cmx5mt (02 Roll)
7	ORS Powder 20.5 gm (20 Sachet)	14	Scissor (1 pc.)

सबब सदर औषधे व वैद्यकिय साहित्यासह प्रथमोचार पेटींची (First Aid Box) खरेदी करणेकामी खालील प्रमाणे सिलबंद लिफाफसामध्ये दरत्रके (अल्प कालावधीचे) मागविणेत येत आहेत. तसेच दरपत्रकारवर **"प्रथमोचार पेटी (First Aid Box) खरेदी करणेकरीता दरपत्रक"** असे नमुद करावे

खरेदीचा तपशिल

अ.क्र.	वस्तु/साहित्याचे नांव	पॅकींग	परिमाण	दर (सर्व करांसहीत)
1	वरील औषधे व वैद्यकिय साहित्य अंतर्भूत असलेली प्रथमोचार पेटी (First Aid Box)	1x1	200	----

दरपत्रकाकरीता नियोजित कालावधी व वेळ

अ.क्र.	तपशिल	दिनांक व वेळ
1	मोहोरबंद दरपत्रक सादर करण्याचा कालावधी	दि. 29/12/2025 ते दि. 02/01/2026 या दरम्यान कार्यालयीन वेळेमध्ये सायंकाळी 04.00 वा. पर्यंत
2	दरपत्र उघडणे व मुल्यांकन	दि. 02/01/2026 सायंकाळी 05.00 वाजता
3	दरपत्रक सादर करावयाचा पत्ता	वैद्यकिय आरोग्य विभाग, भिवंडी निजामपूरशहर महानगरपालिका, जुनी एसटी स्टॅन्ड, कापआळी, भिवंडी, जि. ठाणे.421302

दरपत्रक सादर करणेबाबतच्या सुचना

१) दरपत्रका सोबत एकल निविदा असणे आवश्यक आहे. तसेच सेवा खरेदी प्राधिकाऱ्यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत दरपत्रकधारक यांनी हमी पत्र जोडणे आवश्यक आहे

२) दरपत्रकधारकांनी उपरोक्त बाबींचे दर सद्य:स्थितीतील सर्व करांसहित नमुद करावे. जीएसटी, वाहतुक व इतर खर्च या सर्व बाबींचा अंतर्भाव दरांमध्ये असावा (Rate should be inclusive all charges) सदरचा खर्च वेगळा नमुद करू नये. दरपत्रक उघडतेवेळी पुरवठादार अथवा त्यांचे प्रतिनिधीस हजर राहता येईल

३) पुरवठा केलेल्या साहित्यामध्ये औषधे योग्य दर्जाचे नसल्याचे निदर्शनास आल्यास देयकाची रक्कम अदा करण्यात येणार नाही. तसेच सदर साहित्यामधील औषधे/वैद्यकिय साहित्याचा उत्पादन काळ नजिकच्या काळातील असावा

४) दरपत्रकातील मान्य झालेले दर निवडणूक प्रकिया संपेपर्यंत मान्य राहतील व निवडणूक कालावधीमध्ये आवश्यकतेनुसार पुनर्प्रर्थी आदेश (Repeat Order) देण्यात येईल व दरपत्रकधारकास सदर दरपत्रकामील मंजुर दरानुसार मालाचा पुरवठा तात्काळ करावा लागेल

५) कोणत्याही बाबींसाठी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही

६) दरपत्रकधारक GST No व PAN No नोदणीकृत असावा छापील दरपत्रक संस्थेच्या लेटरहेडवर सही व शिक्कयासह सादर करावे

७) प्रथेमोपचार पेटीचा पुरवठा करतेवेळी त्यामधील औषध/साहित्याचा Batch Report व Lab Testing Report सादर करणे बंधनकारक राहील

८) अटी/शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही

९) दरपत्रकामध्ये कोणतीही खाडाखोड केल्यास सदरचे दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही

१०) दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर उपलब्ध बाजारभावापेक्षा जास्त नसावेत. दरपत्रात नमूद केलेले दर अवास्तव असल्यास वाटाघाटीने दर निश्चित करण्याचा अधिकार वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांना राहील

११) विहित नमुन्यात व विहित कालावधीमध्ये सादर न केलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाहीत

१२) दर सादर करावयाच्या यादीमध्ये कुठलाही फेरफार केल्यास, सदर दरपत्रक तात्काळ रद्द करण्यात येईल

१३) पुरवठादाराने साहित्य स्वखर्चाने पोहोच करावयाचा आहे

१४) देयक अदा करण्यास विलंब झाल्यास कोणताही विलंब आकार अथवा व्याज अदा केले जाणार नाही

१५) दरपत्रक सादर करणाऱ्याकडून दर स्विकृत करण्यासाठी कोणत्याही पध्दतीने दबावतंत्राचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता दरपत्रक नाकारण्यात येईल

१६) दरपत्रकधारकास 3% सुरक्षा ठेव रक्कम अदा करावी लागणार आहे. पुरवठादाकडून पुरवठा कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचे नुकसान अथवा त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे दंडनिय रक्कम वसुल करावयाची असल्यास सदरची रक्कम सुरक्षा ठेव अथवा देयकामधून वसुल केली जाईल

१७) दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या बाबींच्या संख्येमध्ये आवश्यकतेनुसार कमी अथवा जास्त करण्याचा तसेच कोणतीही लेखी सूचना न देता दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे, अंशत: नाकरण्याचा सुपूर्ण अधिकार वैद्यकिय आरोग्य अधिकारी (भि. नि. शहर महानगरपालिका) यांचा असेल

१८) वरील अटी/शर्तीचे पालन न करणाऱ्या दरपत्रकधारक यांचे दरपत्रक पडताळणीअंती अपात्र ठरविण्यात येईल.

(डॉ. संदिप गाडेकर)
वैद्यकिय आरोग्य अधिकारी
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

f:\ashok jadhav 20-6-2020\election of bncmc 2025-26\medical kit.docx11